पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O. OFFICE GADCHIROLI
PHONE NO. 07132223142
E-MAIL : prospoffice.gadchiroli@gmail.com
E-MAIL : progadpolice@mahapolice.gov.in

वार्तापत्र

दि. २०/०७/२०२६

गडचिरोली पोलीसांनी केला अवैध दारु व चारचाकी वाहनासह एकूण ५,९८,३००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

- ***स्थानिक गुन्हे शाखा व उपपोस्टे रेपनपल्ली पोलीसांची संयुक्त कारवाई***

गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असताना अवैधरीत्या छुप्या रीतीने दारु विक्री व वाहतूक करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्याविरुध्द पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांचे अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर प्रभावीपणे कायदेशिर कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. यावरुन काल दिनांक १९ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा व उपपोस्टे रेपनपल्ली येथील पोलीस पथकाने सापळा रचून अवैद्य देशी-विदेशी दारुची वाहतूक व विक्री करणाऱ्या आरोपींविरुध्द कारवाई केलेली आहे.

सविस्तर वृत असे आहे की, काल दिनांक १९ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली पोलीसांना गोपनिय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, इसम नामे संदिप गुराल्ला व त्याचा साथीदार सुरेंदर भुक्या हे पांढऱ्या रंगाच्या फोर्ड कंपनिच्या ईको स्पोर्ट्स या चारचाकी वाहनाने उपपोस्टे रेपनपल्ली हद्दीतील चिल्लर दारु विक्रेत्यांना विदेशी दारुचा पुरवठा करणार आहेत. अशा मिळालेल्या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली व उपपोस्टे रेपनपल्ली येथील पोलीस पथकाने मौजा रेपनपल्ली येथे सापळा रचला असता, मिळालेल्या माहितीप्रमाणे पांढऱ्या रंगाची फोर्ड कंपनीची ईको स्पोर्ट्स चारचाकी वाहन क्र. डी. एल. २ एफ.बी.पी. ००४५ वाहन संशयास्पदरित्या येताना दिसून आली. यावरुन पोलीस पथकाने रस्त्यात तात्पुरता अडथळा निर्माण करुन वाहन चालकास हात दाखवून थांबण्याचा ईशारा केला. यानंतर वाहन चालकाने वाहन रस्त्याच्या बाजुला थांबविल्यानंतर पोलीसांनी वाहन चालक व त्याच्या बाजुला बसलेल्या इसमास त्यांचे नाव व गाव विचारले असता, त्यांनी आपले नाव १) सुरेंदर शंकर भुक्या (नायक), वय ३८ वर्षे, रा. सुभाषनगर, नसपूर ता. जि. मंचेरीअल (तेलंगाणा), २) संदीप स्वामी गुराल्ला, वय ३१ वर्षे, रा. करमपल्ली, ता. चेन्नुर, जि. मंचेरीअल (तेलंगाणा) असे सांगितले.

यानंतर पोलीस पथकाने पंचासमक्ष सदर चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, सदर चारचाकी वाहनामध्ये १) ०८ नग खर्ड्याच्या खोक्यात ७५० एम. एल. मापाच्या ऑफीसर्स चॉईस विस्की कंपनीचे ८९ नग प्लास्टीक बाटल्या एकूण किंमत अंदाजे ८९,०००/- रुपये, २) ०३ नग खर्ड्याच्या खोक्यात ७५० एम. एल. मापाच्या किंगफिशर स्ट्रॉंग कंपनीचे ३१ नग काचेच्या बाटल्या एकूण किंमत अंदाजे ९,३००/- रुपये व ३) अवैध दारुची वाहतूक करण्याकरीता वापरण्यात आलेली एक पांढऱ्या रंगाची फोर्ड कंपनीची ईको स्पोर्ट्स चार वाहन क्रमांक डी. एल. २ एफ.बी.पी. ००४५ किंमत अंदाजे ५,००,०००/- रुपये **असा एकूण ५,९८,३००/- रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेला आहे.** संबंधीत घटनेच्या अनुषंगाने उपपोस्टे रेपनपल्ली येथे दिलेल्या तक्रारीवरुन अप क्र. ३६/२०२६ कलम ६५ (अ), ८३ म.दा.का. अन्वये आरोपी नामे १) सुरेंदर शंकर भुक्या (नायक), वय ३८ वर्षे, रा. सुभाषनगर, नसपूर ता. जि. मंचेरीअल (तेलंगाणा), २) संदीप स्वामी गुराल्ला, वय ३१ वर्षे, रा. करमपल्ली, ता. चेन्नुर, जि. मंचेरीअल (तेलंगाणा) यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. एम. रमेश यांच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., अपर पोलीस अधीक्षक, अहेरी श्री. हर्षवर्धन बी. जे., उपविभागीय पोलीस अधिकारी जिमलगट्टा श्री. राहुल मडावी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली व उपपोस्टे रेपनपल्ली येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.